| | | |
|---|---|---|
| सद्रक्षणाय<br>खलनिग्रहणाय | **जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर**<br>इमेल-<br>cp.thane.pro@mahapolice.gov.in<br>भ्रमरध्वणी क्र. **9819208279** | |

दिनांक ११.१०.२०२४

## ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाकडून सर्व नागरिकांना जनहितार्थ जाहीर आवाहन
## वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे नाव व फोटो वापरून फसवणूक करणाऱ्यांपासून सावधान

सध्याच्या आधुनिक युगात तंत्रज्ञानाचा वापर करून गुन्हा करण्यामध्ये वाढ होत आहे. गुन्हेगारांकडून व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम, फेसबुक अशा सोशल मीडियामधून सर्वसामान्य नागरिकांची वैयक्तिक माहिती मिळविली जाते. पोलीस अधिकारी आणि तपास यंत्रणेतील अधिकारी यांचे सोशल मीडियामधील फोटो स्टेटसवर ठेवून, व्हॉट्सअप मॅसेज तसेच व्हिडीओ कॉल करून सोबत पोलीस कार्यवाही संबंधातील बनावट कागदपत्रे पाठवून नागरिकांना भिती दाखविली जाते. आणि त्यांच्या बॅक खात्यांची तपासणी करण्याचा बहाणा करून त्यांचे बॅक डिटेल्स प्राप्त करून घेवून मोठया प्रमाणात आर्थिक फसवणूक केली जात आहे.

कधी–कधी नागरिकांना त्यांचे कुटूंबीय, नातेवाईक यांना ड्रग्ज तस्करीमध्ये अटक केली आहे, आपल्या नावाचे असलेल्या कुरियर पार्सलमध्ये अवैध मोबाईल सिमकार्ड, आधारकार्ड आणि ड्रग्ज सापडले आहेत व त्यावरून आपल्याविरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला असल्याने आपणास डिजिटल अरेस्ट करण्यात येत आहे असे धमकावले जात आहे.



मागील काही महिन्यांपासून ठाणे आयुक्तालयातील तसेच देशातील इतर राज्यामधील नागरिकांना +९२३०९१६६९६३० या पाकिस्तान येथील मोबाईल क्रमांकावरून कॉल येत असून त्याच्या डिपीवर बाजुच्या छायाचित्रातील वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचा गणवेषातील फोटो लावलेला आहे. त्यांच्याशी संवाद साधणाऱ्या व्यक्तीला **''तुमच्या मुलाला अटक करण्यात आली असून आम्ही सांगतो त्या प्रमाणे करा, अन्यथा त्यास जेलमध्ये टाकण्यात येईल व न्यायालयीन कारवाई करण्यात येईल''** अशी धमकी देवून भिती घालून त्यांचेकडून मोठया प्रमाणात आर्थिक फसवणूक केली जात आहे.

तरी सर्व नागरिकांना जाहिर आवाहन करण्यात येते की, अनोळखी व्यक्तीकडून व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम, फेसबुक अशा सोशल मीडियाद्वारे अपरिचीत मोबाईल क्रमांकावरून संपर्क साधल्यास खालील खबरदारीच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करावी.

- अनोळखी मोबाईल क्रमांकाची Truecaller किंवा Tafcop या वेबसाईटवर खातरजमा करावी.
- आपला सोशल मीडिया प्रोफाईल हॅक झाला असेल किंवा आपल्या फोटोचा सोशल मीडियावर कोठे गैरवापर होत असेल तर तात्काळ खालील वेबसाईटला भेट देवून पुढील कार्यवाही करावी.

✔ Step 1:

https://help.**instagram.com**/contact/779201836048501

https://**www.whatsapp.com**/contact/forms/1534459096974129?lang=en_US

https://**www.facebook.com**/help/contact/278770247037228

वरील कार्यपद्धतीनुसार तक्रार करूनही जर काही कारवाई झाली नाही तर शासनाच्या पुढील वेबसाईटवर तक्रार करावी.

✔ Step 2:

Raise grievance on **www.gac.gov.in** with same ticket ID generated. Ticket is escalated to Ministry of Home Affairs / other committee members.

आपली आर्थिक फसवणूक झाली असल्यास, तात्काळ १९३० या क्रमांकावर कॉल करून किंवा **www.cybercrime.gov.in** या शासकीय संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी आणि नजीकचे पोलीस ठाण्याशी संपर्क करावा.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर